# महिला व बाल विकास आयुक्तालय
# महाराष्ट्र राज्य पुणे
## जाहीर आवाहन

महिला व बालविकास विभाग महाराष्ट्रराज्य पुणे यांचे अधिपत्याखालील संरक्षण अधिकारी कनिष्ठ (वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे १९००) या संवर्गाची भरती प्रक्रिया सध्या सुरु आहे .संरक्षण अधिकारी कनिष्ठ या संवर्गातील पदांची लेखी परिक्षा पुणे ,नाशिक,अमरावती,नागपुर,औरंगाबाद या महसूल विभागाच्या ठिकाणी दिनांक २७/३/२०१६ रोजी आयोजीत करण्यात आलेली आहे.

सर्व उमेदवारांना कळविण्यात की सदर लेखी परिक्षेच्या अनुषंगाने अंतरिम उत्तर तालीका दिनांक २८-३-२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे

**सदर लेखी परिक्षेच्या अनुषंगाने प्रश्नपत्रिका व उत्तरतालीकेबाबत काही आक्षेप असल्यास तसे लेखी निवेदन आवश्यक त्या कागदपत्रांसह दिनांक २८-३-२०१६ ते ३०-३-२०१६ या कालावधीत महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे या कार्यालयात स्वहस्ते सादर करावेत किंवा www.wcdexam.in या संकेतस्थळावर दाखल (अपलोड) करावेत.**इतर कोणत्याही मार्गाने आक्षेप स्विकारले जाणार नाहीत. दिनांक ३०-३-२०१६ रोजी कार्यालयीन वेळेनंतर (सायंकाळी ५.४५ नंतर) प्राप्त होणारे आक्षेप कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत व ते विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. व तदनंतर दिनांक ३१-३-२०१६ रोजी अंतीम उत्तरतालीका प्रसिध्द करण्यात येणार आहे.

**स्वहस्ते आक्षेप सादर करावयाच्या कार्यालयाचा पत्ता-**

१. **महिला व बाल विकास आयुक्तालय महाराष्ट्रराज्य पुणे**
   **२८,राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाऊस शेजारी ,पुणे ०१**
   **दुरध्वनी क्रमांक ०२०-२६३३७११७**

सदरची भरती प्रक्रिया आधिक पारदर्शकपणे व सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने जाहीर आवाहन करण्यात येते की,उमेदवारांनी परिक्षेसंबधी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करु नये तसेच कोणत्याही शासकीय अथवा अशासकीय व्यक्तींच्या भुलथापांना बळी पडु नये.अश्या व्यक्ती उमेदवारांच्या संपर्कात आल्यास त्यांनी सदर व्यक्तींची तक्रार तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये करावी.

दिनांक २२-३-२०१६

आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य पुणे